**प्रेस नोट** **दि.३०/०३/२०१९**

**येरवडा पोलीस स्टेशन पुणे शहर**

**कम्युनिटी पोलिसींग संकल्पने अंतर्गत दिनांक २८/०३/२०१९ रोजी येरवडा पो.स्टे. येथे जेष्ठ नागरिक व महिला दक्षता समितीची बैठक घेतले बाबत.**

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे कम्युनिटी पोलिसींग या संकल्पने अंतर्गत, दि.२८/०३/२०१९ रोजी श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी येरवडा पोलीस स्टेशन, पुणे येथे येरवडा पोलीस ठाणेचे हद्दीतील प्रतिकनगर जेष्ठ नागरिक संघ तसेच महिला दक्षता समितीचे सदस्य यांची बैठक घेतली.

सदर बैठकीमध्ये जेष्ठ नागरिक तसेच महिला दक्षता समितीचे सदस्यांशी सुसंवाद साधून, त्यांच्या अडीअडचणी, सूचना जाणून घेतल्या. त्यांना पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये महिला, बालके व जेष्ठ नागरिकांचे सुरक्षा तसेच तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या ‘भरोसा सेल’ याची माहिती देण्यात येऊन तेथील संपर्क क्रमांक, माहिती पत्रके देण्यात आली. त्याच बरोबर मा.पोलीस आयुक्त कार्यालयामार्फत पुणे शहरात नागरिकांचे सुरक्षेसाठी राबविण्यात येणारे एकूण १४ विविध योजनांबाबत माहिती देण्यात आली आहे.

जेष्ठ नागरिक, महिला, बालके यांचे सुरक्षेसाठी घ्यावयाची दक्षता, खबरदारी याबाबत माहिती देऊन, त्यांचे तक्रारी, अडीअडचणींबाबत तात्काळ पोलीसांशी संपर्क साधणेबाबत आवाहन करून स्वतःचा तसेच चौकी अधिकारी यांचे मोबाईल नंबर त्यांना देण्यात आले आहेत.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.चे श्री. राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी चांगली कामगिरी केली आहे.

( **राजेंद्र कदम** )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे



